## स्पर्धेचे विषय :

१. एआयचा उदय : नोकऱ्यांचा संहार की संधीचा सागर?
२. २०४७ चा भारत : स्वप्नांचा सूर्य आणि उज्वल भविष्य
३. सावित्री नसती तर? – स्त्रीशक्तीचा अनोखा वारसा
४. शेतकरी : अन्नदाता की उपेक्षित योद्धा?
५. रील्स – तरुणाईचे शस्त्र की स्वत:वरच उलटणारे संकट?
६. अरण्यमहर्षी मारुती चितमपल्ली : जंगलाचा जिवंत श्वास

### ❊ पारितोषिके ❊

**प्रथम पुरस्कार** – रू. ११०००/- व फिरता चषक
माजी विद्यार्थी संघटना विद्याभारती महाविद्यालय, अमरावती द्वारा पुरस्कृत रोख पारितोषिक

**द्वितीय पुरस्कार** – रू. ७१००/-
स्व. जयवंताबाई दादाराव बनसोड स्मृती पारितोषिक

**तृतीय पुरस्कार** – रू. ३१००/-
स्व. सौ. रत्नप्रभा दत्तात्रय वाकोडे स्मृती पारितोषिक


**उत्तेजनार्थ पुरस्कार** – रू. २१००/-
स्व. प्रा. बी. जी. कडू स्मृती पारितोषिक

### संयोजन समिती

| | |
|---|---|
| डॉ. डी. एस. रंगाचार्य – | ९८९०९७६२८३ |
| डॉ. जी. डी. बनसोड – | ९७३०४१९१५९ |
| डॉ. एस. के. रोड्डे – | ९३७१२८०२२३ |
| प्रा. आर. बी. कांबळे – | ९४२२४१६५२८ |

संयोजक
**प्रा. डॉ. व्ही. पी. शेकोकार**
इंग्रजी विभाग प्रमुख
संपर्क : ८०७७४४१८५

**डॉ. प्रज्ञा येनकर**
प्राचार्य
विद्याभारती महाविद्यालय, अमरावती



बुक-पोस्ट

प्रति,

प्रेषक
**डॉ. प्रज्ञा येनकर**
प्राचार्य
विद्याभारती महाविद्यालय, सी.के.नायडू रोड,
कॅम्प, अमरावती. ४४४६०२, दुरध्वनी -०७२१-२६६२७४०
संकेत स्थळ- www.vbmv.org

प्रेरणास्थान



स्व.डॉ.देवीसिंह शेखावत

युवा नेतृत्व



श्री. रावसाहेब शेखावत



सौ. मंजरी शेखावत

प्रेरणास्थान



श्रीमती प्रतिभाताई पाटील
प्रथम महिला राष्ट्रपती

GEMS **विद्याभारती जेम्स आयोजित**
**राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन**

# वक्तृत्व स्पर्धा २०२५-२६
(वर्ष – अकरावे)

स्पर्धा दिनांक : शनिवार दि. २७ सप्टेंबर, २०२५ वेळ : सकाळी ९.३० वा.

स्थळ : दृकश्राव्य सभागृह, तिसरा माळा



## विद्याभारती महाविद्यालय, कॅम्प, अमरावती

- नॅक, बँगलोर द्वारा सलग तिसऱ्यांदा 'अ' दर्जा प्राप्त (सीजीपीए-३.२३)
- युजीसी तर्फे 'सीपीई' दर्जा प्राप्त
- युजीसी परामर्श योजने अंतर्गत 'मेंटर' महाविद्यालय दर्जा प्राप्त
- डीबीटी तर्फे तारांकित महाविद्यालय दर्जा प्राप्त
- 'अग्रणी महाविद्यालय' सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती.
- ISO प्रमाणित : २००९ : २०१५


स्पर्धेचे विषय :

१. एआयचा उदय : नोकऱ्यांचा संहार की संधीचा सागर?
२. २०४७ चा भारत : स्वप्नांचा सूर्य आणि उज्वल भविष्य
३. सावित्री नसती तर? – स्त्रीशक्तीचा अनोखा वारसा
४. शेतकरी : अन्नदाता की उपेक्षित योद्धा?
५. रील्स – तरुणाईचे शस्त्र की स्वत:वरच उलटणारे संकट?
६. अरण्यमहर्षी मारुती चितमपल्ली : जंगलाचा जिवंत श्वास

❊ पारितोषिके ❊

प्रथम पुरस्कार – रू. ११०००/- व फिरता चषक
माजी विद्यार्थी संघटना विद्याभारती महाविद्यालय, अमरावती द्वारा पुरस्कृत रोख पारितोषिक

द्वितीय पुरस्कार – रू. ७१००/-
स्व. जयवंताबाई दादाराव बनसोड स्मृती पारितोषिक

तृतीय पुरस्कार – रू. ३१००/-
स्व. सौ. रत्नप्रभा दत्तात्रय वाकोडे स्मृती पारितोषिक


उत्तेजनार्थ पुरस्कार – रू. २१००/-
स्व. प्रा. बी. जी. कडू स्मृती पारितोषिक

संयोजन समिती

डॉ. डी. एस. रंगाचार्य – ९८९०९७६२८३
डॉ. जी. डी. बनसोड – ९७३०४१९१५९
डॉ. एस. के. रोड्डे – ९३७१२८०२२३
प्रा. आर. बी. कांबळे – ९४२२४१६५२८

संयोजक
प्रा. डॉ. व्ही. पी. शेकोकार
इंग्रजी विभाग प्रमुख
संपर्क : ८०७७४४१८५

डॉ. प्रज्ञा येनकर
प्राचार्य
विद्याभारती महाविद्यालय, अमरावती



बुक-पोस्ट

प्रति,

प्रेषक
डॉ. प्रज्ञा येनकर
प्राचार्य
विद्याभारती महाविद्यालय, सी.के.नायडू रोड,
कॅम्प, अमरावती. ४४४६०२, दुरध्वनी -०७२१-२६६२७४०
संकेत स्थळ- www.vbmv.org

प्रेरणास्थान



स्व.डॉ.देवीसिंह शेखावत

युवा नेतृत्व



श्री. रावसाहेब शेखावत



सौ. मंजरी शेखावत

प्रेरणास्थान



श्रीमती प्रतिभाताई पाटील
प्रथम महिला राष्ट्रपती

GEMS विद्याभारती जेम्स आयोजित
राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन

वक्तृत्व स्पर्धा २०२५-२६
(वर्ष – अकरावे)

स्पर्धा दिनांक : शनिवार दि. २७ सप्टेंबर, २०२५ वेळ : सकाळी ९.३० वा.

स्थळ : दृकश्राव्य सभागृह, तिसरा माळा



विद्याभारती महाविद्यालय, कॅम्प, अमरावती

- नॅक, बँगलोर द्वारा सलग तिसऱ्यांदा 'अ' दर्जा प्राप्त (सीजीपीए-३.२३)
- युजीसी तर्फे 'सीपीई' दर्जा प्राप्त
- युजीसी परामर्श योजने अंतर्गत 'मेंटर' महाविद्यालय दर्जा प्राप्त
- डीबीटी तर्फे तारांकित महाविद्यालय दर्जा प्राप्त
- 'अग्रणी महाविद्यालय' सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती.
- ISO प्रमाणित : २००९ : २०१५

अमरावती पश्चिम विदर्भाची शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी मानली जाते. या शहराला अनन्य साधारण ऐतिहासिक महत्त्व आहे. येथे माता अंबा व एकविरेचे पुरातन मंदिरे आहेत. कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी, दाजी पटवर्धन, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख व भारताच्या प्रथम महिला राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील इत्यादी महानुभावांच्या वास्तव्याने येथील मातीला एक वेगळा सुगंध प्राप्त झाला आहे.

ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या अमरावती शहरात स्व.डॉ. देवीसिंह शेखावत यांच्या प्रयत्नातून १९७२ मध्ये स्थापन झालेल्या विद्याभारती महाविद्यालयाने दर्जेदार शिक्षणाच्या वाटा निर्माण करून एक नामांकित महाविद्यालय म्हणून आपला लौकिक निर्माण करत अमिट ठसा उमटविला आहे. केवळ विज्ञान विद्या शाखेने सुरू झालेल्या या इवल्याश्या रोपट्याने आज बहुविद्याशाखीय शैक्षणिक केंद्राचे रूप धारण केले आहे. आज येथे कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, संगणक, सौंदर्यशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र इत्यादींचे शिक्षण कनिष्ठ स्तरापासून पदवी, पदव्युत्तर व संशोधन (आचार्य) पदवीस्तरापर्यंतचे शिक्षण दिले जाते.

महाविद्यालयाने सुरूवातीपासूनच आज पर्यंतच्या प्रवासात अनेक सक्षम व जबाबदार नागरिक घडवून राष्ट्राच्या सेवेत समर्पित केले आहेत. केवळ पदव्या वाटून चालणार नाही तर रोजगाराच्या संधी निर्माण कराव्या लागतील या विचाराने प्रेरित होवून मा. आ. श्री. रावसाहेब शेखावत यांच्या कणखर नेतृत्वात मागील पाच वर्षात जवळपास ४००० तरुणांना रोजगार मिळवून देण्यात येथील व्यवस्थापन यशस्वी झाले आहे. ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला व क्रीडा अशा विविध कला जाणिवांनी विद्यार्थ्यांची मने संस्कारित व्हावीत म्हणून विविध पूरक शैक्षणिक उपक्रमांचे सतत आयोजन केले जाते.

विद्यार्थी केंद्रीत उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने संस्थेने सौ. मंजरी शेखावत यांच्या पुढाकारात **'विद्याभारती जेम्स'** हा समूह निर्माण केला आहे. याद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना विकसित करणे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणने चांगल्यारीतीने साधले आहे.

महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा पुढे नेत आमचे सजग विद्यार्थी शिक्षण, क्रीडा, प्रशासन, उद्योग, व्यवसाय व समाजकारण आदी क्षेत्रात झळकत आहेत, याचा आम्हांस सार्थ अभिमान वाटतो.

महाराष्ट्राला वक्तृत्व कलेची मोठी संपन्न परंपरा आहे. आपल्या परखड व रांगड्या वक्तृत्वासाठी आचार्य प्र. के. अत्रेंना उभा महाराष्ट्र जाणतो. तद्नंतर प्राचार्य राम शेवाळकर व प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या सर्वस्पर्शी वक्तृत्वाची आठवण होते. विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर शिकणाऱ्या तरुणांमध्ये वाचनाची व पर्यायाने वक्तृत्वाची आवड निर्माण व्हावी, त्यांनी चौफेर वाचन व चिंतन करावे आणि वक्तृत्वाचे धडे गिरवावीत या हेतूने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेच्या निमित्ताने चिंतनातून निर्माण झालेले विचारधन उधळले जावे, सामाजिक समस्यांचा उलगडा व्हावा व त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेचे दर्शन घडावे हीच आयोजनामागील अपेक्षा आहे. तरी आपल्या प्रथितयश महाविद्यालयातील वाक्पटुंना या स्पर्धेत सहभागासाठी पाठवावे या अपेक्षेसह !

## विशेष सूचना

१. प्रथम प्राप्त ५० अधिकृत प्रवेशिकाच या स्पर्धेकरीता पात्र ठरतील याची स्पर्धकांनी नोंद घ्यावी.
२. पात्र ठरलेल्या स्पर्धकांना ई-मेल / व्हॉट्सअप द्वारे कळविण्यात येईल.
३. स्पर्धकांनी दि. २५-०९-२०२५ पर्यंत खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून किंवा क्युआर कोड स्कॅन करुन ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करावी. महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (www.vbmv.org) सुध्दा नाव नोंदणी करता येईल.

Registration Link : https://forms.gle/qVxwryQWSzGYoBYf8

## स्पर्धेचे नियम व अटी

१. ही स्पर्धा महाराष्ट्रातील फक्त पदविका / पदवी / पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली राहील.
२. कोणत्याही महाविद्यालयाला जास्तीत जास्त दोन विद्यार्थी स्पर्धेसाठी पाठविता येतील, मात्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीचेच प्रवेशपत्र स्वीकारले जातील.
३. स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतून होईल.
४. प्रत्येक स्पर्धकास ६ मिनीटे वेळ देण्यात येईल. (५+१)
५. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रती स्पर्धक रू. १५०/- राहील. स्पर्धेच्या दिवशी प्रवेश शुल्क रोख स्वीकारले जाईल.
६. स्पर्धेसाठी येताना विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत ठेवणे अनिवार्य आहे.
७. स्पर्धकास प्रवास खर्च स्वत: करावा लागेल. बाहेर गावाहून येणाऱ्या स्पर्धकांची निवास व्यवस्था केली जाईल मात्र, निवास व्यवस्था हवी असल्यास प्रवेश पत्रातच स्पष्ट करावे.
८. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्रे दिले जातील.
९. स्पर्धा संपल्यानंतर लगेच पारितोषिक वितरण समारंभ होईल.
१०. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.
११. स्पर्धेच्या प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख २५ सप्टेंबर २०२५ राहील.
१२. स्पर्धेची तारीख, वेळ बदलण्याचा अधिकार संयोजक महाविद्यालयाकडे राहील.
१३. स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांना दुपारचे जेवण महाविद्यालयातर्फे देण्यात येईल.
१४. फिरता चषक विजेता स्पर्धक ज्या महाविद्यालयाचा असेल त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना या महाविद्यालयाकडे पुढील वर्षी होणाऱ्या स्पर्धेच्या एक महिना अगोदर आपल्या खर्चाने पोहचवावा लागेल.

Website : www.vbmv.org
Email : vshegawkar@gmail.com

## मागील स्पर्धेची क्षणचित्रे (२०२४-२५)



विजेती स्पर्धक : नफीसा हुसेन, इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, बडनेरा






अमरावती पश्चिम विदर्भाची शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी मानली जाते. या शहराला अनन्य साधारण ऐतिहासिक महत्त्व आहे. येथे माता अंबा व एकविरेचे पुरातन मंदिरे आहेत. कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी, दाजी पटवर्धन, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख व भारताच्या प्रथम महिला राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील इत्यादी महानुभावांच्या वास्तव्याने येथील मातीला एक वेगळा सुगंध प्राप्त झाला आहे.

ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या अमरावती शहरात स्व.डॉ. देवीसिंह शेखावत यांच्या प्रयत्नातून १९७२ मध्ये स्थापन झालेल्या विद्याभारती महाविद्यालयाने दर्जेदार शिक्षणाच्या वाटा निर्माण करून एक नामांकित महाविद्यालय म्हणून आपला लौकिक निर्माण करत अमिट ठसा उमटविला आहे. केवळ विज्ञान विद्या शाखेने सुरू झालेल्या या इवल्याश्या रोपट्याने आज बहुविद्याशाखीय शैक्षणिक केंद्राचे रूप धारण केले आहे. आज येथे कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, संगणक, सौंदर्यशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र इत्यादींचे शिक्षण कनिष्ठ स्तरापासून पदवी, पदव्युत्तर व संशोधन (आचार्य) पदवीस्तरापर्यंतचे शिक्षण दिले जाते.

महाविद्यालयाने सुरूवातीपासूनच आज पर्यंतच्या प्रवासात अनेक सक्षम व जबाबदार नागरिक घडवून राष्ट्राच्या सेवेत समर्पित केले आहेत. केवळ पदव्या वाटून चालणार नाही तर रोजगाराच्या संधी निर्माण कराव्या लागतील या विचाराने प्रेरित होवून मा. आ. श्री. रावसाहेब शेखावत यांच्या कणखर नेतृत्वात मागील पाच वर्षात जवळपास ४००० तरुणांना रोजगार मिळवून देण्यात येथील व्यवस्थापन यशस्वी झाले आहे. ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला व क्रीडा अशा विविध कला जाणिवांनी विद्यार्थ्यांची मने संस्कारित व्हावीत म्हणून विविध पूरक शैक्षणिक उपक्रमांचे सतत आयोजन केले जाते.

विद्यार्थी केंद्रीत उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने संस्थेने सौ. मंजरी शेखावत यांच्या पुढाकारात **'विद्याभारती जेम्स'** हा समूह निर्माण केला आहे. याद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना विकसित करणे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणने चांगल्यारीतीने साधले आहे.

महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा पुढे नेत आमचे सजग विद्यार्थी शिक्षण, क्रीडा, प्रशासन, उद्योग, व्यवसाय व समाजकारण आदी क्षेत्रात झळकत आहेत, याचा आम्हांस सार्थ अभिमान वाटतो.

महाराष्ट्राला वक्तृत्व कलेची मोठी संपन्न परंपरा आहे. आपल्या परखड व रांगड्या वक्तृत्वासाठी आचार्य प्र. के. अत्रेंना उभा महाराष्ट्र जाणतो. तद्नंतर प्राचार्य राम शेवाळकर व प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या सर्वस्पर्शी वक्तृत्वाची आठवण होते. विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर शिकणाऱ्या तरुणांमध्ये वाचनाची व पर्यायाने वक्तृत्वाची आवड निर्माण व्हावी, त्यांनी चौफेर वाचन व चिंतन करावे आणि वक्तृत्वाचे धडे गिरवावीत या हेतूने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेच्या निमित्ताने चिंतनातून निर्माण झालेले विचारधन उधळले जावे, सामाजिक समस्यांचा उलगडा व्हावा व त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेचे दर्शन घडावे हीच आयोजनामागील अपेक्षा आहे. तरी आपल्या प्रथितयश महाविद्यालयातील वाक्पटुंना या स्पर्धेत सहभागासाठी पाठवावे या अपेक्षेसह !

## विशेष सूचना

१. प्रथम प्राप्त ५० अधिकृत प्रवेशिकाच या स्पर्धेकरीता पात्र ठरतील याची स्पर्धकांनी नोंद घ्यावी.
२. पात्र ठरलेल्या स्पर्धकांना ई-मेल / व्हॉट्सअप द्वारे कळविण्यात येईल.
३. स्पर्धकांनी दि. २५-०९-२०२५ पर्यंत खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून किंवा क्युआर कोड स्कॅन करुन ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करावी. महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (www.vbmv.org) सुध्दा नाव नोंदणी करता येईल.

Registration Link : https://forms.gle/qVxwryQWSzGYoBYf8

## स्पर्धेचे नियम व अटी

१. ही स्पर्धा महाराष्ट्रातील फक्त पदविका / पदवी / पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली राहील.
२. कोणत्याही महाविद्यालयाला जास्तीत जास्त दोन विद्यार्थी स्पर्धेसाठी पाठविता येतील, मात्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीचेच प्रवेशपत्र स्वीकारले जातील.
३. स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतून होईल.
४. प्रत्येक स्पर्धकास ६ मिनीटे वेळ देण्यात येईल. (५+१)
५. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रती स्पर्धक रू. १५०/- राहील. स्पर्धेच्या दिवशी प्रवेश शुल्क रोख स्वीकारले जाईल.
६. स्पर्धेसाठी येताना विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत ठेवणे अनिवार्य आहे.
७. स्पर्धकास प्रवास खर्च स्वत: करावा लागेल. बाहेर गावाहून येणाऱ्या स्पर्धकांची निवास व्यवस्था केली जाईल मात्र, निवास व्यवस्था हवी असल्यास प्रवेश पत्रातच स्पष्ट करावे.
८. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्रे दिले जातील.
९. स्पर्धा संपल्यानंतर लगेच पारितोषिक वितरण समारंभ होईल.
१०. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.
११. स्पर्धेच्या प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख २५ सप्टेंबर २०२५ राहील.
१२. स्पर्धेची तारीख, वेळ बदलण्याचा अधिकार संयोजक महाविद्यालयाकडे राहील.
१३. स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांना दुपारचे जेवण महाविद्यालयातर्फे देण्यात येईल.
१४. फिरता चषक विजेता स्पर्धक ज्या महाविद्यालयाचा असेल त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना या महाविद्यालयाकडे पुढील वर्षी होणाऱ्या स्पर्धेच्या एक महिना अगोदर आपल्या खर्चाने पोहचवावा लागेल.

Website : www.vbmv.org
Email : vshegawkar@gmail.com

## मागील स्पर्धेची क्षणचित्रे (२०२४-२५)



विजेती स्पर्धक : नफीसा हुसेन, इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, बडनेरा

